# शिकाऊ उमेदवार (कोपा,विजतंत्री व तारतंत्री) जाहिरात

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित संवसु विभाग,वाशिम अंतर्गत सर्व उपविभागांकरिता कोपा-०६, विजतंत्री-३६ व तारतंत्री-३६ असे एकुण ७८ शिकाऊ उमेदवारी पदे भरण्याकरिता पात्र उमेदवारांची निवड समितीद्वारे गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. त्याकरिता पात्र उमेदवारांनी दि. ०८.०२.२०२१ चे सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर नोंदणी करुन ऑनलाईन अर्ज करावा. सर्व प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे तसेच कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव बघता तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमावलीनुसार गुणवत्ताधारक (Merit List नुसार) शिकाऊ उमेदवारांचे निवडीबाबतची सुचना उमेदवारांचे नोदंणीकृत मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी(email id) वर पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्यामुळे उमेदवारांनी या कार्यालयात येण्याची गरज नाही निवड झालेल्या उमेदवारांना नोदंणीकृत ईमेल आयडी वर निवडी बाबत कळविण्यात येईल.

**अटी व शर्ती :** १) शिकाऊ उमेदवारांचे वय किमान १८ वर्षे पुर्ण असणे आवश्यक आहे. २) सदर उमेदवार हा वाशिम जिल्ह्यातील रहिवासी असावा. **पात्रता :** १) महाराष्ट्रातील मान्यता प्राप्त (१०+२) व वाशिम जिल्ह्यातील शासनमान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन (कोपा,विजतंत्री व तारतंत्री) व्यवसाय मागास प्रवर्गातील(अ.ज. व अ.जा.करिता) उमेदवारांकरिता ५५% गुण व उर्वरित प्रवर्गाकरिता किमान ६०% गुण मिळवुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. २) मागासवर्गीय उमेदवारांची निवड भारतीय शिकाऊ उमेदवार कायद्यानुसार करण्यात येईल त्याकरिता उपविभागीय अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल. ३) उमेदवारांने www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. ४) कोपा, विजतंत्री व तारतंत्री या संवर्गाचा प्रशिक्षण कालावधी एक वर्षाकरिता राहिल. ५) प्रशिक्षण कालावधीत शिकाऊ उमेदवारांना शासकीय नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. ६) उमेदवारांची Profile परिपुर्ण असणे आवश्यक आहे. अपुर्ण Profile असणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व निवड झालेल्या पात्र उमेदवारांनी आपल्या सोबत येताना आपली सर्व मुळ कागदपत्रे व त्यांची साक्षांकित्त दोन छायाप्रती सोबत आणावी. ७) प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेदवारांना कंपनीच्या सेवेत सामावुन घेणे बंधनकारक नाही याची नोंद घ्यावी. ८) जाहिरातीतील बदल किंवा जाहिरातीत काही भागात अंशतः बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

**कार्यकारी अभियंता**

**पीआरओ नं. ००५/२०२१** **संवसु विभाग, महावितरण, वाशिम**